N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म-१)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण **P.S.(ठाणे):** वरुड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0566 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/09/2023 23:08

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 01/09/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/09/2023
   **Time From (वेळेपासून):** 13:40 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/09/2023 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 039
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/09/2023 22:42 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय वरूड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): कैलास मानिकराव जाधव

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1975

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वाडेगाव ता वरूड,वरुड ,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वाडेगाव ता वरूड,वरुड ,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. कैलास मंगलाजी बनसरे | | | 1. एल आय सी कलनी अमरावती , वरुड ,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 3000 रू | 3,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक: 01/09/2023 कैलास माणिकराव जाधव,वय-48वर्ष,धंदा-शेतमूजरी, रा.वाडेगाव, पो.कोटी, ता. वरूड,जि. अमरावती. मो.क्र.9673101609 मी समक्ष सा. बा. वि. चे विश्रामगृह, वरूड येथे हजर असून, मी वर नमुद दिले पत्यावर कुटूंबासह राहणेस आहे. मी दि.31/08/2023 रोजी ला.प्र.वि.अमरावती चे पोनि.श्री.सतिष उमरे यांचेशी फोनव्दारे संपर्क करून, माझी लाच मागणी संदर्भात तक्रार असून, आपण आपले पथकासह तात्काळ राजूरा बाजार,वरूड येथे येण्याबाबत विनंती केली. त्यावरून पोनि.उमरे हे स्वतः व ला.प्र.वि.अमरावती येथील पोनि. प्रविन बोरकुटे, स्टाफ व आय.टी.आय. अमरावती कार्यालयातील पंच क्र.1 श्री.प्रविन चव्हाण व पंच क्र.2 किषोर आगर यांचेसह सापळा पथक शासकीय वाहनाने राजूरा बाजार,वरूड येथे आले. त्यानंतर आम्ही राजूरा बाजार येथून चिंचरगव्हाण रोडने पुढे जावून एका निर्जन स्थळी थांबलो. त्यावेळी पोनि.उमरे यांनी त्यांचा स्वतःचा व सापळा पथकातील पोनि.बोरकुटे व स्टाफ व दोन्ही पंचाचा परिचय करून दिला व माझा परिचय दोन्ही पंचांना व सापळा पथकाला करुन दिला. त्यावेळी मी पंचाना माझी लेखी तक्रार दाखविली व ती तक्रार सर्वासमक्ष थोडक्यात तोंडी सांगीतली. '' माझेकडे वडेगाव येथे गट नं.68/3 मध्ये 2 एकर शेती असून, मी शेती व रोजमजूरी चे काम करतो. माझे शेतामध्ये जूनी खचलेली विहीर होती. विहीर खचलेली असल्यामुळे मी सण 2020-21 मध्ये त्या विहीरला दुरूस्त करून, विहीर बांधुन घेतली.माझी विहीरीची दुरूस्ती करित असताना, माझे शेताशेजारील षेतकरी प्रभाकर मांगुळकर रा.राजूरा बाजार,यांनी माझेविरूध्द तहसिल कार्यालय वरूड येथे मी विहीर दुरूस्त केलेबाबत तक्रार दिली. या तक्रारीचे अनुशंगाने वरूड तहसिलदार कार्यालय येथे हजर राहण्याबाबत मला नोटीस दिल्याने,मी दिलेल्य तारखेनुसार तहसिल कार्यालयात वरूड येथे तहसिलदार यांचे समक्ष हजर झालो होतो. त्यावेळी त्यानी माझी तोंडी व लेखी जबाब नोंदविला. त्यानंतर मला तहसिल कार्यालय वरूड येथून कोणत्याही प्रकारची नोटीस आली नाही. परंतू मला दि.09/08/2023 रोजी माझे मो.9673101609 वर वाडेगाव येथील तलाठी श्री.बनसरे यांचा मो.नं. 8421896153 वरून फोन आला व म्हणले की, तुम्ही शेतातील विहीर दुरूस्त करण्याचे काम पुन्हा सुरू केले काय? असे विचारले. त्यावेळी मी श्री.बनसरे यांना म्हणलो की, मी नव्याने विहीर दुरूस्त करण्याचे काम केले नाही. तुम्ही स्वतः प्रत्यक्ष शेतात येवून चैकशी करू शकता. त्यावर तलाठी श्री.बनसरे मला म्हणाले की, वरूड चे नविन तहसिलदार साहेब यांनी मला मोबाईलवर आपले विरूध्द तक्रार पाठविली.त्यामुळे मी तुमचे विरोधात मा.तहसिलदार वरूड यांना अहवाल पाठवितो. जर तुम्हाला अहवाल तुमच्या बाजूने हवा असल्यास,तुम्ही मला भेटा असे सांगीतले. त्यानंतर मी दि.17/08/23 रोजी तलाठी श्री.बनसरे यांना त्यांचे कार्यालयात जावून समक्ष भेटलो असता.तलाठी श्री.बनसरे यांनी मला श्री.प्रभाकर मांगुळकर रा.राजूरा बाजार यांनी माझे विरूध्द तहसिल कार्यालय वरूड येथे 2 वर्षापुर्वी केलेले तक्रारीमध्ये माझे बाजूने अहवाल तयार करून,मा.तहसिलदार वरूड यांना पाठविण्याकरिता मला 10000/-रू.लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझेकडे इतके पैसे नाहीत.परंतू मी त्यांना 5000/-रू.पर्यत तुम्हाला जुळवा-जुळव करून देईल असे सांगून तेथून निघून आलो. त्यानंतर तलाठी श्री.बनसरे यांनी मला वारंवार फोन करून पैसे देण्याचा तगादा लावला. परंतू मी त्यांना काही ना काही कारण सांगून पैसे देण्याचे टाळले आहे.

परंतू मला तलाठी श्री.बनसरे यांना 5000/-रू.लाच रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने, त्यांचेवर कायदेषीर कारवाई करिता आपलेकडे तक्रार देत आहे. तलाठी श्री.बनसरे यांचेसोबत माझा कोणताही आथिक व्यवहार नसून, त्यांचेशी माझा कोणताही प्रकारचा वाद नाही.ष् अषी लेखी तक्रार नोंदविली. त्यानंतर पोनि.श्री.बोरकुटे यांनी मला व दोन्ही पंचांना महत्वाच्या सुचना देवून पडताळणीपुर्व पंचनामा कार्यवाही केली.त्यानंतर पडताळणी कारवाई करण्याकरिता तलाठी श्री.बनसरे हे कार्यालयात हजर आहेत काय? याबाबत मला माहीती घेण्यास सांगीतले, त्यावेळी मी माहीती घेतली तर तलाठी श्री.बनसरे हे कार्यालयात हजर नसल्याचे समजले. त्यानतर बराच वेळ वाट पाहील्यानंतर मला तलाठी श्री.बनसरे यांचा फोन आला व त्यांना मला दि.01/09/23 रोजी तहसिल कार्यालय, वरूड येथे भेटण्यास सांगीतले.सदरबाबत मी ला.प्र.वि.अमरावती पथकाला माहीती दिली.

त्यानंतर आज दि.01/09/2023 रोजी मी गजानन महाराज मंदिर, गजानन नगर, वरूड जि.अमरावती येथे येवून

थांबलो व सकाळी 11/00वा.चे सुमा.पोनि.बोरकुटे,पोनि.उमरे, दोन्ही पंच व सापळा पथक असे सदर ठिकाणी आलेत. त्यानंतर मी,तलाठी श्री.बनसरे यांना फोन केला असता, ते तहसिल कार्यालयात आले असून, त्यांनी मला भेटण्याकरिता तहसिल कार्यालय, वरूड येथे बोलावीले. त्यावेळी पोना/राहूल वंजारी यांनी नविन मेमरी कार्ड काढून ते डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकून रेकॉडर माझेजवळ देवून पंच क्र.1 श्री.चव्हाण यांचेसह तलाठी श्री.बनसरे, यांना भेटण्याकरिता तहसिल कार्यालय,वरूड माझे दुचाकी वाहनाने रवाना झालो.त्यानंतर तहसिल कार्यालय,वरूड येथे पोहचून, दुचाकी पार्कीगमध्ये पार्क करुन, मी पंच क्र.1 श्री.चव्हाण असे तहसिल कार्यालयामध्ये गेलो असता, तहसिल कार्यालयाचे पहील्या मजल्यावर पोर्चमध्ये तलाठी श्री.बनसरे, 1 अनोळखी व्यक्तीसोबत बोलत उभे होते. त्यावेळी मी व पंच क्र.1 श्री.चव्हाण असे तलाठी श्री.बनसरे यांचेजवळ जावून थांबलो, काही वेळाने श्री.बनसरे यांचे त्या अनोळखी व्यक्ती सोबत बोलून झालेनंतर,मी बनसरे यांना माझे कामाविशयी बोलावयास सुरवात केली.त्यावेळी तलाठी बनसरे यांनी पंच क्र.1 श्री.चव्हाण हे कोण आहेत? याबाबत मला विचारले असता, मी जावई असल्याचे सांगीतले. त्यावेळी बनसरे यांनी पंच क्र.1 यांना गाव विचारले असता, पंच क्र.1 यांनी आश्टी असे सांगीतले. त्यानंतर तलाठी बनसरे यांनी पंच क्र. 1 चव्हाण यांना तेथेचे थांबयला सांगून, ते मला घेवून दुस-या मजल्यावर चढायच्या जिण्याकडे घेवून गेले व तेथे तलाठी श्री.बनसरे यांनी मला श्री.मंगुळकर यांचे तक्रारी संदर्भात माझे बाजूने तहसिलदार वरूड यांना अहवाल देण्यासाठी माझेसोबत बोलणी करून, मला 5000/-रू.लाचेची मागणी केली व पैसे आणले काय? याबाबत विचारणा केली. त्यावेळी मी पैसे सोबत आणले नाही असे सांगून, पैसे कमी करण्याबाबत त्यांना विनंती केली असता, श्री.बनसरे यांनी तडजोडीअंती 3000/-रू.लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षविली व पैसे फोन पे करा असे सांगीतले.परंतू मी त्यांना माझेकडे फोन पे नसल्याचे सांगीतले. त्यावेळी तलाठी बनसरे यांनी लाच रक्कम 3000/-रू. लवकर आणून देण्यास सांगीतले. त्यावेळी बनसरे यांना मुलाला पैसे घेवून बोलावितो असे सांगीतले असता,श्री.बनसरे हे मला म्हणाले,तुम्हीच पैसे घेवून या.त्यावेळी मी त्यांना होय म्हणून,मी व पंचा क्र. 1 श्री.चव्हाण असे सापळा कारवाई पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो.

अषाप्रकारे तलाठी श्री.बनसरे यांनी मला श्री.प्रभाकर मांगुळकरांनी माझेविरूध्द तहसिलदार वरूड यांचे कडे माझे विहीरीचे संदर्भात केलेले तक्रारी अर्जावर माझे बाजूने तहसिलदार वरूड यांना अहवाल पाठविण्याकरिता, पंचासमक्ष 5,000/-रू.लाचेची मागणी करून,3000/-रू.लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षविल्याचे निष्पन्न झाल्याने, लागलीच पोनि.बोरकुटे यांनी मला व पंचाना सापळापुर्व कारवाई करणार असल्याचे सागुन,मला श्री.बनसरे यांना देण्याकरीता लाच रक्कम हजर करण्यास सांगीतली.त्यावेळी मी माझेकडील 500 रु.दराच्या 06 नोटा एकुण 3,000/-रु.हजर केले. त्यावेळी पोनि.बोरकुटे यांनी सांगीतले की, आता सदर नोटांना अॅंथ्रासिन पावडर लावणार आहोत. त्यानंतर पोकॉ./शैलेष कडू यांनी आम्हाला अॅंथ्रासिन पावडर व अॅट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहीती देवून त्या नोटांना अॅंथ्रासिन पावडर लावण्यात येवून मला व दोन्ही पंचांना सापळा कारवाई बाबतच्या महत्वाच्या सुचना देण्यात आल्या व मला श्री.बनसरे जेव्हा लाच रक्कम स्विकारेल तेव्हा पोनि.बोरकुटे यांना मिसकॉल देणे, हा पैसे स्विकारले बाबतचा ईशारा रा ठरला. त्यानंतर पोनि.बोरकुटे यांनी मला व पंचांना सांगितले की, आता आपण तहसील कार्यालय वरूड,जि.अमरावती येथे जावुन तेथील तलाठी श्री.बनसरे यांचेविरुध्द सापळा आयोजित करणार आहोत. त्यानंतर पोना/राहूल वंजारी यांनी नविन मेमरी कार्ड घेवून व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकून ते सुरु करुन माझे जवळ देण्यात आले.तेव्हा मी आणि पंच क्र.1 श्री.चव्हाण सोबत रवाना झालो. त्यानंतर आमचे मागोमाग सापळा कारवाईतील सर्व सदस्य आले व तहसील कार्यालय वरूड,कार्यालय परिसरात आजू-बाजूला थांबुन सापळा आयोजित केला. त्याचवेळी मी व पंच क्र.1 श्री.चव्हाण असे तहसील कार्यालय,वरूड येथे दुचाकी वाहनाने पोहचलो. दुचाकी पार्कीगमध्ये पार्क करून,मी व पंच क्र.1 चव्हाण असे तहसिल कार्यालयाचे पहील्या मजल्यावर गेलो व तेथून मी तलाठी बनसरे यांना फोन केला असता, तलाठी बनसरे माझेकडे आले व आम्हाला सोबत घेवून ते तहसिल कार्यालयाचे पार्कीगकडे घेवून गेले. त्यावेळी मी तलाठी बनसरे यांना माझे विहीरीचे तक्रारी संदर्भातील अहवालाबाबत विचारपूस केली असता, तलाठी बनसरे यांनी मला अहवाल तयार असल्याचे सांगून, मी तहसिलदारांना अहवाल आजच पाठवित असे सांगीतले व मला पैसे आणले काय? याबाबत विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना माझे शर्टचे वरील खिशात ठेवलेले 3000/-रू. उजव्या हाताने काढून दिले व पैस मोजून घ्या.असे म्हणालो असता,तलाठी बनसरे यांनी पैसे मोजून घेवून ते यांचे

शर्टचे वरील खिशात ठेवले. त्यांवेळी मी पोनि.बोरकुटे यांना मिसकॉल देवून,लाच रक्कम स्विकारण्याबाबतचा इशारा केला असता,पोनि.बोरकुटे व सापळा पथक लागलीच आले व पोनि.श्री.बोरकुटे, पोनि.उमरे व पथक यांनी,तलाठी श्री.बनसरे यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोना/वंजारी यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केले.

त्यानंतर पोनि.बोरकुटे यांनी तलाठी श्री.बनसरे यांना स्वतःचा व सापळा पथकाचा परिचय करून दिला व बनसरे यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता,तलाठी बनसरे यांनी त्यांचे शर्टचे खिशा तून लाच रक्कम

काढून दिली. त्यानंतर पोनि.बोरकुटे यांनी बनसरे यांना त्यांचे नाव, पद, व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव कैलास मंगलाजी बनसरे, वय-54वर्षे, पद-तलाठी,साजा क्र.76,ता.वरूड जि.अमरावती, असे सांगितले. त्यानंतर पोनि.बोरकुटे यांनी सदर सापळा कारवाई बाबत प्रभारी तहसिलदार श्री.संतोश आश्टीकर,यांना समक्ष माहीती देवून पुढिल कारवाई करिता आम्ही सर्व सां.बा.वि.चे विश्रामगृह, वरूड,येथे आलो व पोनि.बोरकुटे यांनी केलेल्या पडताळणी व सापळा कार्यवाहीचा सवस्तिर पंचनामा केला.

अशाप्रकारे पडताळणी कार्यवाही दरम्यान कैलास मंगलाजी बनसरे,वय-54वर्षे, पद-तलाठी,साजा क्र. 76, ता.वरूड जि.अमरावती,रा.एल.आय.सी.कॉलणी प्लॉट नं.14/2,ओम किराणा जवळ, शेगाव-रहाटगाव रोड, अमरावती यांनी आपले पदाचा दुरूपयोग करून, माझे षेता षेजारील षेतकरी श्री.मांगुळकर यांनी तहसिलदार वरूड यांचेकडे माझे विहीरीचे संदर्भात केलेले अर्जासंदर्भात माझे बाजूने अहवाल देण्यासाठी मला पंचासमक्ष 5000/-रू. लाचेची मागणी करुन,तडजोडीअंती 3000/-रू.स्विकारण्याची तयारी दर्षविली वरून,आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान तलाठी श्री.बनसरे,यांनी माझेकडून 3000/-रु.लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून त्यांचे विरूध्द कायदेषिर फिर्याद आहे.

माझी वरिल संगणकावर टाईप केलेली मराठीतील फिर्याद,प्रिंट काढूण मला वाचण्यास दिली असता, ती मी वाचून वाचुन पाहली असता, घडलेल्या वस्तुस्थितीप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष सही( प्रविण बोरकुटे ) पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.अमरावती

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
SHITAL ARUN NIMJE
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):** 15101000402SA
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**